**<u>फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२३/२०२५ मधील निशाणी क्र.०५ वरील आदेश</u>**

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार हिने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ प्रमाणे अंतरिम पोटगीची मागणी केली आहे.

०२. **<u>अर्जामागची थोडक्यात पार्श्वभूमी अशी की,</u>**

प्रस्तुत अर्जदार यांनी उपरोक्त कलमान्वये पोटगी मागण्याकरीता केलेला मूळ अर्ज हा अर्जदारांच्या साक्षीपुराव्याकरीता प्रलंबित आहे. अर्जदार हिचे अर्जात कथन असे की, अर्जदार ही सामनेवाला क्र.१ याची पत्नी आहे. अर्जदार हिचा विवाह सामनेवाला क्र.१ याचेशी दि.१७/०३/२०२३ रोजी झाला. सदर लग्नामध्ये अर्जदार हिचे आई वडीलांनी सामनेवाला यांच्या सांगण्याप्रमाणे संसारउपयोगी साहित्य दिले.

०३. लग्नानंतर अर्जदार ही सामनेवाला यांच्या घरी सासरी मौजे बिटले, ता.मोहोळ येथे नांदणेस गेली. लग्नानंतर सुरुवातीचे एक महिना सामनेवाला यांनी अर्जदार हिला कसेबसे नांदवले व त्यानंतर सामनेवाला क्र.१ ते ४ हे अर्जदार हिला घर बांधण्यासाठी, घरखर्चासाठी माहेरुन पाच लाख रुपये व ५ तोळे सोने याची मागणी करु लागले व त्यासाठी तिला घालून पाडून बोलणे, शिवीगाळ करणे, मारहाण करणे इ. कृत्य करु लागले. सामनेवाला क्र.१ हे सामनेवाला क्र.३ व ४ यांच्या सांगण्यावरुन अश्लील शिवीगाळ व सतत मारहाण करत होते. सामनेवाला क्र.३ व ४ यांनी अर्जदार हिला प्रचंड मानसिक व शारीरीक त्रास दिलेला आहे. दि.१७/०२/२०२४ रोजी अर्जदार हिने बाटलीमधले पाणी प्यायल्याने तिच्या पोटात प्रचंड दुखु लागले परंतु सामनेवाला यांनी अर्जदार हिला दवाखान्यात नेण्यास टाळाटाळ केली. त्यावेळी अर्जदार हिच्या पाण्यात कोणीतरी विषारी औषध टाकले होते व उलट अर्जदार हिने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असे आरोपी अर्जदार हिच्यावर करण्यात आले.

०४. दि.५/०२/२०२४ रोजी सामनेवाला यांनी अर्जदार हिला स्वयंपाक येत नाही या कारणावरुन तिला शिवीगाळी केली व गंभीर स्वरुपाचे मारहाण करुन तिला सांभाळायचे नाही, तु माहेरी निघुन जा व पैसे व सोने घेऊन ये, नाहीतर निघुन जा, तुझे काहीतरी बरेवाईट करीन, अधी धमकी व तिला घरातून कपड्यानिशी हाकलून दिले. त्यावेळी अर्जदार हिने स्वतः व तिच्या नातेवाईकांमार्फत अनेकवेळा सामनेवाला यांना समजावण्याचा व नांदवण्यास घेऊन जाण्याबाबत प्रयत्न केला असता सामनेवाला यांनी त्यास नकार दिला व सामनेवाला हे ऐकण्याच्या मनस्थितीत नाहीत. त्यामुळे अर्जदार हिने दि.०२/०१/२०२५ रोजी वकील

श्री.एस.डी.लाळे यांचेमार्फत सामनेवाला यांना नोटीस पाठवली. सदर नोटीसीस सामनेवाला यांनी उत्तर नोटीस पाठवून त्यामध्ये सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिला सोडचिठ्ठीची मागणी केली. अशाप्रकारे अर्जदार हिस नांदण्याची इच्छा असताना सामनेवाला यांनी अर्जदार हिला नांदवण्यास नकार दिला. त्यामुळे अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे. सामनेवाला यांनी तिला हाकलून दिल्यापासून आजतागायत तिच्या उदरनिर्वाहाची, कपडालत्याची, राहण्याची, औषधोपचाराची आणि खर्चाची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे अर्जदार हिला प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले आहे.

०५. सामनेवाला क्र.१ हा पंढरपूर नगरपरिषद, पंढरपू येथे नोकरी करत असून त्यास दरमहा रु.४५,०००/- इतका पगार आहे. सामनेवाला क्र.२ हे पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर येथुन सेवानिवृत्त असून त्यांना दरमहा रु.२२,०००/- इतका सेवानिवृत्त वेत मिळतो. तसेच सामनेवाला यांची मौजे देगाव, ता.पंढरपूर येथे गट क्र.२२१, क्षेत्र ०१ हे.५४ आर. एवढी जमीन असून त्यापासून त्यांना वार्षिक ४ ते ५ लाख रुपये इतके उत्पन्न मिळते. सामनेवाला यांच्या नावे अनेक प्लॉट व जागा आहेत. त्यामुळे एकुणच सामनेवाला यांची आर्थिक परिस्थिती अतिशय उत्तम आहे. याउलट, अर्जदार हिस जगण्याचे कोणतेही साधन नाही. अर्जदार ही स्वतःची उपजिवीका स्वतः करु शकत नाही. सामनेवाला यांनी अर्जदार हिचा स्वतःहून त्याग केलेला आहे. त्यामुळे अर्जदार हिच्या उदरनिर्वाहची व देखभाल करण्याची जबाबदारी सामनेवाला यांचेवर आहे. त्यामुळे अर्जदार हिने प्रस्तुत अर्जाव्दारे अर्जदार हिला मुळ अर्ज निकाल होईपर्यंत अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रक्कम रु.३०,०००/- अंतरीम पोटगी म्हणुन सामनेवाला यांना देण्याबाबत आदेश व्हावा यासाठी दाखल केला आहे.

०६. सामनेवाला यांना वारंवार व पुरेशी संधी देऊन देखील सामनेवाला यांनी अर्जदार हिचे प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे दि.१७/०९/२०२५ रोजी नि.०५ वर आदेश पारीत करुन प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला यांच्या म्हणण्याविण्या चालविण्यात आला.

०७. अर्जदार हिच्या कथनावरुन उपस्थित झालेली बाब व त्यावरील माझा निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नमूद करीत आहे -

| अ.क्र. | विचारार्थ बाबी | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही मागणीप्रमाणे अंतरिम पोटगीचा आदेश मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | अंशतः होकारार्थी, दरमहा रुपये ४,०००/- प्रमाणे. |
| २. | काय आदेश ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

**<u>कारणमिमांसा</u>**

०८. अर्जदार यांचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदार यांचे वकीलांनी अर्जात नमुदप्रमाणे युक्तिवाद केलेला आहे. अर्जदार हिच्या अर्जातील कथनांचे व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

**<u>विचारार्थ बाब क्र.१ करीता –</u>**

०९. अर्जदारा हिच्या कथनानुसार सामनेवाला यांनी लग्नाच्या एक महिन्यानंतर अर्जदार हिला घर बांधण्यासाठी, घरखर्चासाठी माहेरुन पाच लाख रुपये व ५ तोळे सोने आणण्याची मागणी करुन तिला सतत घालुन पाडून बोलणे, शिवीगाळी करणे व मारहाण करुन शारीरीक व मानसिक त्रास देत होते व त्या कारणासाठी तिला घरातून हाकलून देऊन तिचा त्याग केला. अर्जदार हिची नांदण्याची तयारी असतानाही सामनेवाला यांनी स्पष्टपणे अर्जदार हिस नांदवण्यास नकार दिला व तिला सासरहून हाकलून देवुन तिच्या उदरनिर्वाहची कोणतीही सोय केली नाही.

१०. याउलट सामनेवाला यांना वारंवार व पुरेशी संधी देऊन देखील सामनेवाला यांनी अर्जदार हिच्या कथनांना खोडुन काढण्यासाठी कोणताही लेखी अथवा तोंडी म्हणणे सादर केलेले नाही. त्यामुळे अर्जदार हिचा प्रस्तुतचा अर्ज सामनेवाला यांच्या म्हणण्याविना चालविण्यात आला.

११. अर्जदार हिच्या अर्जातील कथने विचारात घेता तिने सामनेवाला यांचेविरुध्द गंभीर स्वरुपाचे आरोप केल्याचे दिसून येते. त्यामुळे उभय पक्षांना त्यांचे म्हणणे पुराव्यानिशी सिध्द करण्यास संधी देणे आवश्यक दिसून येते. निश्चीतच प्रकरणाचा गुणवत्तेवर निर्णय देण्यास बराच अवधी लागणार आहे. सामनेवाला यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केला नसला तरी अर्जदार हिने तिच्या वकीलांमार्फत सामनेवाला यांना पाठविलेल्या नोटीसीस सामनेवाला यांनी उत्तर नोटीस पाठवले आहे. सदर उत्तर नोटीसीचे अवलोकन करता त्यामध्ये सामनेवाला यांनी अर्जदार हिच्याशी असलेले नातेसंबंध मान्य केले आहे व इतर संपुर्ण मजकुर अमान्य केला आहे. यावरुन सामनेवाला यांनी अर्जदार हिच्यासोबत असलेले पती–पत्नीचे नातेसंबंध मान्य व कबूल असल्याची बाब याठिकाणी दिसून येते. त्यामुळे अर्जदार हिचेशी असलेले सामनेवाला क्र.१ यांचे नातेसंबंध सामनेवाला यांनी नाकारले नसल्यामुळे अर्जदार हिचा सांभाळ करण्याची जबाबदारी सामनेवाला यांचेवर आहे.

१२. अर्जदार हिच्या कथनाप्रमाणे तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन उपलब्ध नाही.

सदरची बाब तिने निशाणी क्र.०७ वर उत्पन्नाबाबतच्या मालमत्ता दायीत्वाचे प्रतिज्ञापत्रात नमुद केले आहे. तसेच अर्जदार हिला स्वतःच्या पालनपोषणाचा व इतर कपडेलत्यासाठी खर्च करणे तिला शक्य नाही. अर्जदार ही तिचा स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. अर्जदार हिने सामनेवाला हा नोकरी करत असून त्यास दरमहा रु.४५,०००/– इतका पगार व सामनेवाला क्र.२ यांना दरमहा रु.२२,०००/– इतका सेवानिवृत्त वेतन मिळत असल्याचे कथन केले आहे. परंतु सदर कथनापुष्टयर्थ अर्जदार हिने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. तसेच सामनेवाला यांची मौजे देगाव, ता.पंढरपूर येथे गट क्र.२२१, क्षेत्र ०१ हे.५४ आर. एवढी जमीन असून त्यापासून त्यांना वार्षिक ४ ते ५ लाख रुपये इतके उत्पन्न मिळत असल्याचे देखील अर्जदार हिचे कथन आहे. सदर कथनापुष्टयर्थ अर्जदार हिने सदर शेतजमीनीचा ७/१२ उता–याची प्रत दाखल केली आहे. परंतु, सदर मिळकत ही सामनेवाला यांची सामाईक व वडीलोर्जित मिळकत असल्याचे दिसून येते. सामनेवाला यांच्या नावे स्वतंत्र शेती असल्याबाबतचा कोणताही पुरावा अर्जदार हिने दाखल केलेला नाही.

१३. अर्जदार हिने सामनेवाला यांचे नोकरीसंबंधी पुरावा व त्यांचे उत्पन्नाचे साधन याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नसला तरी सामनेवाला यांनी अर्जदार हिस पाठवलेल्या उत्तर नोटीसीमध्ये सामनेवाला क्र.१ याने तो पंढरपूर येथे नगरपालिकेमध्ये सफाई कामगार असल्याची बाब मान्य केली आहे. त्यामुळे निश्चितच सामनेवाला हा नोकरी करत असून त्यातुन त्याला पगार मिळतो असे गृहित धरणे वावगे ठरणार नाही.

१४. एकंदरीत संपुर्ण अभिलेखाचे व उपलब्ध कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन करता अर्जदार ही सध्या तिच्या माहेरी राहत असल्याची बाब तिने शपथेवर कथन केले आहे व त्यास सामनेवाला यांनी देखील म्हणणे देऊन विरोध केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे सद्य परिस्थितीमध्ये सामनेवाला याचेवरती अर्जदार हिचा सांभाळ करण्याची जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे सामनेवाला यास कोणताही गंभीर आजार अथवा शारीरीक अपंगत्व असल्याबाबतचा पुरावा अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे एकंदरीत संपूर्ण अर्जाचा व दाखल कागदोपत्री पुरावाच्या विचार करता सामनेवाला हा दरमहा अर्जदार हिस रु.४,०००/– इतकी अंतरीम पोटगी सहज देवू शकतो असे म्हणता येईल. **अशा परिस्थितीत मी मुद्दा क्र.१ चे उत्तर त्याप्रमाणे देत आहे.**

**<u>मुद्दा क्र.२ संदर्भात–</u>**

१५. वरील विवेचनावरुन मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# <u>आ दे श</u>

१. अर्ज **(नि.०५)** अंशतः मंजूर करण्यात आला.

२. सामनेवाला यास असा निर्देश देण्यात येत आहे की, त्याने अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार हिस दरमहा रुपये ४,०००/- (अक्षरी रुपये चार हजार फक्त) प्रमाणे अंतरीम पोटगीची रक्कम म्हणून प्रकरणाचा अंतीम निकाल लागेपर्यंत द्यावी.

३. सदर आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना विनामुल्य देण्यात यावी.

PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR
Digitally signed by PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR
Date: 2025.12.30 17:02:47 +0200

दिनांक -२९/११/२०२५.

(**श्रीमती पी.एस.गोवेकर**)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, मोहोळ

<u>CERTIFICATE</u>

I affirm that, the contents of this PDF file of Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | A.S. Bakale |
| Court | : | Judicial Magistrate F.C. Mohol |
| Date | : | 29/11/2025 |
| Judgment signed by the Presiding Officer | : | 29/11/2025 |
| Judgment Uploaded on | : | 30/12/2025 |